**कृष्णा प्रकल्प, जि. सातारा या प्रकल्पाच्या फेरजलनियोजनास मान्यता मिळणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्र. कृष्णाप्र ०६२३/(प्र.क्र. २६१/२३) मोप्र-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४००-०३२
दिनांक : ३० सप्टेंबर, २०२३

संदर्भ:- १) शासन निर्णय क्रमांक: बिसिंआ २०२१/(२५३/२०२१)/सिंव्य (धो-२) दिनांक-०७/०१/२०२२.
२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र. मकृखोविम/ ०१/(१९८/२०२३)/प्र.बां.५/५५७३/२०२३, दि-२९/०९/२०२३

**प्रस्तावना:-**

कृष्णा प्रकल्प हा कृष्णा नदीवर असून त्यास सन १९६७ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. कृष्णा प्रकल्पाच्या पाणीवापरात होणाऱ्या बदलामुळे पुनर्विलोकन करून कृष्णा प्रकल्पाचे पाणी वापराचे फेरनियोजनास शासनाची मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये प्राप्त झाला आहे.

यापूर्वी सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील औंधसह १६ गावांना सिंचनासाठी कृष्णा प्रकल्पातील कण्हेर जलाशयातून पाणी आरक्षित होणेसाठी कृष्णा प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनास शासन निर्णय दि.०७.०१.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तदनंतर बोंडारवाडी प्रकल्पासह कृष्णा प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनास मान्यता मिळणेसाठी प्राप्त प्रस्तावानुसार सुधारित जलनियोजन अंतिम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये सादर केलेल्या फेरजलनियोजनाच्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित शासन निर्णय क्र.बिसिंआ २०२१/(२५३/२०२१)/सिं.व्य.(धो-२), दि.०७.०१.२०२२ अधिक्रमित करून खालील अटींच्या अधीन राहून कृष्णा प्रकल्प, जि. सातारा या प्रकल्पाच्या सुधारीत फेरजलनियोजनास परिशिष्ट - अ नुसार मान्यता देण्यात येत आहे.

१. महामंडळाने सादर केलेल्या कृष्णा प्रकल्पाच्या सुधारीत फेर जलनियोजनाची संपुर्ण जबाबदारी कार्यकारी संचालक व मुख्य अभियंता यांची राहील.

२. सदर नियोजनानुसार एकात्मिक राज्य जल आराखड्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे.

३. प्रस्तावित फेर नियोजनामुळे कृष्णा खोरे पाणी तंटा लवादामधील तरतुदींचा भंग होणार नाही याची खातरजमा महामंडळाने करावी.

४. सदर जलनियोजनामध्ये बदल होणार नाही याची दक्षता महामंडळाने घ्यावी.

सदर शासन निर्णय मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

(संदिप भालेराव)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र :परिशिष्ट - अ**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
४. मा.विधानसभा/ विधानपरिषद सदस्य सर्व
५. स्वीय सहाय्यक, अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
६. स्वीय सहाय्यक, सचिव(लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
७. स्वीय सहाय्यक, सचिव(प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
८. कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
९. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (दवप्र) व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
१०. सर्व तांत्रिक उप सचिव/अवर सचिव/उप अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
११. सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे,

मोप्र-१ कार्यासन.

**कृष्णा प्रकल्प, जि. सातारा या प्रकल्पाचे फेरजलनियोजन**
**शासन निर्णय क्र. कृष्णाप्र ०६२३/(प्र.क्र. २६१/२३) मोप्र-१**
**परिशिष्ट - अ**

| अ. क्र. | प्रवर्गनिहाय/ योजनानिहाय पाणीवापर | शासन पत्र दि.२०/१०/२००१ नुसार लवादास सादर केलेले नियोजन (अ.घ.फु.) | शासन निर्णय क्र: बिसिंआ २०२१/(२५३/२०२१)/सिंव्य (धो-२) दि.०७/०१/२०२२ नुसार मंजूर पाणीवापर (अ.घ.फु.) | मंजूर सुधारित पाणीवापर (अ.घ.फु.) |
|---|---|---|---|---|
| १. | सिंचनासाठी | | | |
| | १. धोम | २६.८६८ | २८.११८ | ११.६९ |
| | २. कण्हेर | | | ७.२८ |
| | ३. वसना उसियों | | | १.४४ |
| | ४. वांगणा उसियों | | | १.९३ |
| | ५. जिहे कठापूर | | | ५.७४२ |
| | ६. औंध उसियो | ०.००० | | १.२५# |
| | ७. बोंडारवाडी | ०.००० | | ०.७९८ |
| | **एकूण सिंचनासाठी** | **२६.८६८** | **२८.११८** | **३०.१३** |
| २. | पिण्यासाठी | ४.८० | ३.९६७ | १.५३८ |
| ३. | औद्योगिक वापरासाठी | ०.४१७ | | ०.४१७ |
| | **एकूण** | **३२.०८५** | **३२.०८५** | **३२.०८५** |

*# शासन निर्णय दि.०७.०१.२०२२ अन्वये औंध उपसा सिंचन योजनेकरिता १.२५ अ.घ.फु. पाणी वापरास मान्यता प्राप्त आहे.*

(संदिप भालेराव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन